# वसंतराव नाईक शेतीमित्र २००९

## साप्ताहिक कृषकोन्नती

### यशवंत स्टेडीयम समोर, धंतोली, नागपूर - १२




- दि. २६ जून, २००७ रोजी पहिला अंक प्रकाशित.
- सेंद्रिय शेतीचा पुरस्कार करणारे शेती विषयक साप्ताहिक असल्याचा लौकिक (दर मंगळवारी प्रकाशित होणारे साप्ताहिक )
- कृषि विभागाच्या योजना, यशोगाथा, शेती पूरक व्यवसायाबाबत कृषि विभागाचे काम सातत्याने करणारे साप्ताहिक.
- शेतक-याचे प्रशिक्षण वर्ग, अभ्यास दौरे असे उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न.
- शेतक-याचा परिवार व परिसर,  आरोग्य शिक्षण असा सर्वांगिण विचार करणारे एकमेव साप्ताहिक.
- ग्रामविकास, महिला बचतगट या विषयावरील प्रकाशित झालेल्या यशोगाथा महाराष्ट्रात अनेकांना प्रेरणादायक .

# वसंतराव नाईक शेतीमित्र २००९

## श्री.राहुल बाळकृष्ण सहारे

### मु. हिरापूर, पो. निमखेड (बा.), ता.अंजनगाव (सुर्जी), जि. अमरावती



- पत्रकारितेबरोबरच ई टीव्ही मराठीच्या अन्नदाता या कार्यक्रमात सहयोगी म्हणून काम करतात.
- गटशेती, फळबाग व दुग्धव्यवसाय याबाबतच्या यशोगाथा, गट पध्दतीने ५००० पक्षांचा पोल्ट्रीफॉर्म इत्यादी कार्यक्रमाचे प्रामुख्याने प्रसारण.
- अन्नदाता मासिकामध्ये दिवसेदिवस विभागणारी जमीन, तुटणारे शेतकरी यासाठी गट शेतीचे फायदे या विषयावर सातत्याने लिखाण.
- आंबा लागवड ते निर्यात तंत्रज्ञान, द्राक्ष उत्पादन, बेदाणा निर्मिती व द्राक्ष निर्यात इ. कार्यक्रमाचे प्रसारण.
- ई टीव्ही व अन्नदाता मासिक कार्यक्रमाच्या माध्यमातून शेतक-यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्याचे काम.
- आले लागवडीची यशोगाथा संपूर्ण भारतात प्रसारीत केल्याने आले लागवडीच्या क्षेत्रात भरीव वाढ.
- बायोगॅसवर विद्युत निर्मिती हा एक उपाय - या विशेष कार्यक्रमाचे यशस्वी प्रसारण

# वसंतराव नाईक शेतीमित्र २००९

## श्री. विश्वंभर सोपान बाबर

### मु.पो. देवापूर, ता. माण, जि. सातारा



- दै. पुढारी वृत्तपत्राचे दहिवडी, जि. साताराचे वार्ताहार म्हणून कार्यरत.
- पत्रकारितेच्या माध्यमातून दुष्काळी माण तालुक्यातील रेंगाळलेला पाणीप्रश्न धसास लावला.
- डाळींब पीक लागवडीबाबत विशेष प्रबोधन करुन स्वत:चे शेतात उच्चांकी उत्पादन.
- माणगंगा फळे/फुले, भाजीपाला खरेदी विक्री संस्था म्हसवडची स्थापना केली असून सदर संस्थेचे अध्यक्ष.
- कृषिविषयक लिखाण करुन शेतक-यांचे हित जपण्याचा प्रयत्न.
- पशसंवर्धन, दुग्धव्यवसाय या बाबीस चालना देण्यासाठी राज्य शासनाच्या विविध योजना शेतक-यापर्यंत पोहचविण्याचे काम केले.
- पत्रकारितेबद्दल माणदेशी पुरस्काराने सन्मानित.

# वसंतराव नाईक शेतीमित्र २००९

## श्री. सचिन आत्माराम होळकर

### मु.पो. लासलगाव (होळकरवाडी), ता. निफाड, जि. नाशिक



- शेतीबरोबरच पत्रकारितेचा व्यवसाय.
- सन २००६ मध्ये उद्यानविद्या पदवीमध्ये राज्यात सर्वप्रथम.
- विविध नियतकालिकांमधून २५१ चे वर कृषिविषयक लेख प्रसिध्द.
- फायदेशीर शेवगा लागवड, भेंडी/ आले लसूण/ कारली/ कलिंगड लागवड या विषयावरील पुस्तके प्रकाशित.
- सौंदर्य आणि आयुर्वेद तसेच आरोग्यदायी फळे या पुस्तकांचे लिखाण कार्यरत.
- कोरडया तसेच कमी पाण्याची शेती यावर शेतक-यांना पत्र व दूरध्वनीद्वारे मोफत सल्ला.
- विविध कृषिविषयक मासिकांतून मोफत सल्ला व नि:शुल्क सेवा देण्याचे काम.

# वसंतराव नाईक शेतीमित्र २००९

## श्री. धोंडोपंत रामराव कुलकर्णी

### मु.पो. हाडोळती, ता. अहमदपूर, जि. लातूर



- एकूण जमीनधारणा २४.२६ हे. असून कायद्याचे पदवीधर असूनही वकिली व्यवसाय न करता शेती व्यवसायावर लक्ष केंद्रित.
- सन २००६-०७ मध्ये लाल कंधारी गायीवर विशेष लिखाण
- पत्रकारितेच्या माध्यमातून कृषि विभागाच्या विविध योजना, यशोगाथा, ग्रामीण कारागीर इ. विषयांवर लिखाण.
- सहकारी, खाजगी संस्था, सोसायटी इ. मध्ये विविध पदे भूषविण्याचा मान.
- तालुक्यातील महिलांना संघटीत करुन गावामध्ये दारुबंदी करण्यास शासनास भाग पाडले.
- पत्रकारितेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील परिस्थितीचे दर्शन घडवून अनेक गावे हागणदारीमुक्त केली.